**Subject – मराठी** | **Model Answer**
**Set – 1**

## विभाग – १: गद्य
### पठित गद्य

**प्र.१ अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

१) i) एका पिल्लांनी तर वाघिणीच्या **पाठीवरच** उडी घेतली.

ii) एका पिल्लानं बाजूच्या **जांभळीच्या** झाडीतून थेट पाण्यात उडी घेतली होती.

iii) एक वर्षाचा वाघांच्या अभ्यासानं आणि अनुभवानं हे ठाऊक होतं, की **हा वाघिणीचा आवाज आहे.**

iv) वाघीण पिल्लांच्या सुरक्षेबद्दल भलतीच **दक्ष** असते.

२) आकृती पूर्ण करा.

i) वाघिणीची पिल्लांवर गुरुगुरण्याच्या क्रियेची स्थिती – मंद

ii) पिल्लांना लपवून ठेवण्याची जागा – जांभळी दाट झुडुप

iii) वाघिणीचा पिल्लांना बोलवल्याचा आवाज – ऑऽ व्हऽऽ

iv) पाण्यात पडल्याचा होणारा आवाज – धपकन

३) **व्याकरण**

i) दोन अर्थपूर्ण शब्द तयार करा.

वाघिणीचा - **चावा, वाणी, वाचा, वाघिणी**

ii) भर प्रत्यय लावून शब्द तयार करा.

अ) मण - **मणभर** ब) हात - **हातभर**

४) वाघिणीने आपल्या पिल्लांना नाल्याकाठच्या जांभळीच्या दाट झुडपात लपवले होते. परिसरातील शत्रू जनावांरापासून त्यांचे रक्षण व्हावे नि पिल्ले सुखरूप रहावीत ही काळजी वाघिणीने घेतली होती. वाघीण पिल्लांच्या सुरक्षेबद्दल खूप जागरक होती. रात्रभर जंगलात फिरून वाघीण आली, तेव्हा आईची हाक ऐकताच लपलेली पिल्ले तिच्याकडे आनंदाने झेपावली. वाघीण पाण्यात बसली तेव्हा पिल्लांच्या आनंदाला उधाण आले. यावरून पिल्लांचे आईवरील असीम प्रेम दिसते. सगळया पिल्लांनी पाण्यात उडया मारल्या व त्यांना दंगाधोपा सुरू झाला. जरा वेळाने केलेली शिकार पिल्लांना खाऊ घालावी म्हणून वाघीण पाण्यातून उठली व चालू लागली तशी तिच्यामागे दोन पिल्ले निघाली. दोन अजून पाण्यातच खेळत होती. वाघिणीने परत वळून त्या दोघांना बोलावण्याचा आवाज काढला तशी ती पिल्ले तिच्यामागे पळत सुटली.


**प्र.१ आ) पुढील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती सोडवा.**

१) उताऱ्यातील पुढील संकल्पनांचा अर्थ स्पष्ट करा:

i) वजन कमी करण्यासाठी पंतांना जे उपद्व्याप करावे लागले, त्याने जेरीस येऊन त्यांनी हे सत्य आकळणारे उद्‌गार काढले आहेत. काट्यांतून चालावे तसा हा वजन कमी करण्याचा मार्ग आहे, असा या वाक्याचा अर्थ आहे.

ii) सगळयांच्या सल्ल्यांनुसार वागणे, वजन कमी करण्यासाठी पराकाष्ठा करणे भलभलते उपाय करणे याला मनाचा असामान्य निग्रह म्हणजे निर्धार असे म्हटले आहे.

२) आकृती पूर्ण करा:




३) व्याकरण

i) संधी सोडवा. अ) दु: + दैव ब) मन: + निग्रह


ii) अनेकवचन लिहा. अ) स्वप्ने ब) बिया

४) जेव्हा पंतांनी वजन घटवण्याचा शेवटचा निकराचा प्रयत्न केला; त्या वेळी त्यांनी केलेल्या कृती फारच विनोदी आहेत. त्यांना सडपातळ झाल्याची स्वप्ने पडू लागली. जेवणाचे ताट पुढे असताना न खाता ते उठू लागले. साखर पाहिली की त्यांना अतोनात राग येऊ लागला. लिंबाचा रस म्हणजे त्यांना अमृत वाटू लागले. धारोष्ण दुधासाठी ते अंधेरीच्या गोठ्यात जाऊ लागले. नि सर्वांत कहर म्हणजे बिनसाखरेचा आणि बिनदुधाचाच नव्हे; तर बिनचहाचा ते चहा पिऊ लागले. ही पंतांची झालेली परिस्थिती पाहून मला खूप हसू आले.


**प्र.१ अपठित गद्य**

**इ) पुढील उताऱ्याच्या आधारे कृती सोडवा.**

१) i)




ii)




२) एका वाक्यात उत्तर लिहा.

i) धंनिकांनी राष्ट्रासाठी धन दीले. ii) कारखान्यात कामगार उत्पादन वाढवू लागले ?

३) व्याकरण

i) विरूद्धार्थी शब्द लिहा. अ) वृद्ध × **तरुण** ब) रात्र × **दिवस**

ii) दोन अर्थपूर्ण शब्द तयार करा :- कामगारवर्ग - **कामगार, वर्ग, गार, काम, गाव**

४) माझ्या शाळेत मी पाचवीत असताना वर्ग प्रमुख ही जबाबदारी होती. मी व माझा मित्र सहाय्यक वर्ग प्रमुख होतो. दोघे मिळून आम्ही वर्गात शिक्षक नसताना वर्ग शांत तेवण्याचे काम करीत असू. गृहापाठाच्या वह्या जमा करणे, त्या शिक्षकां पर्यंत पोहोचवले त्यावर सही, शिक्क्षा घेणे अशी कामे करीत असू. वर्गातून सूचना फिरवणे, व एखाद्या स्पर्धेत किंवा संमेलनात काम करण्यास इच्छुक विद्यार्थिची यादी तयार करणे. क्रीडा महोत्सवसाठी मुलांना उत्सुक करणे व सर्व शिक्षकांशी संपर्क व समन्वय ठेवणे हा माझा अनुभव यातून खूप काही शिकण्यासारखे होते.

**विभाग – २ : पद्य**

**प्र.२ अ) आकृती पूर्ण करा.**

**१) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

i) चौकटी पूर्ण करा.

मजेचे { रंग कशाचे आहेत } उद्याचे

ii) i. राबवणाऱ्या हातांना पाठबळ देणे.

ii. डोंगरावर बिया उधळणे

२) खालील संकल्पना स्पष्ट करा.

अ) आभाळाचे छत्र - आभाळातून पाऊस पडतो त्यामुळे सगळयांना पाणी मिळते, धान्य पिकते आभाळाचा आधार मिळतो म्हणून आभाळाला छत्र म्हटले आहे.

३) वसुंधरेचा हिरवेपणा जपण्यासाठी सगळीकडे स्वच्छता करू. प्लॅस्टिकचा वापर बंद करू. जास्त झाडे लावू. अस्वच्छ पाणी समुद्र व नदीत होणार नाही, याकडे लक्ष केंद्रित करू. कारखाने गिरणीमुळे होणाऱ्या प्रदूषणात वाढ होऊ नये याकडे तंत्रज्ञांनाचा उपयोग करून थांबविण्याचा प्रयन्त करू. जलप्रदूषण, वायुप्रदूषण होणार नाही याची काळजी घेऊ.

४) रंग मजेचे रंग उदयाचे या कवितेच्या कवयित्री अंजली कुलकर्णी आहेत. कवयित्रीने निसर्गसौंदर्याच्या विलोभनीय आविष्कारत जगण्याचा खराखुरा आंनदही मिळेल असा दृष्टिकोन कवयित्रीने कवितेत मांडला आहे. जागतिकीकरणाच्या या काळात संगणक धान्य देत नाही म्हणून आपल्याला मातीशी संबंध ठेवावा लागेल. मातीमध्ये राबणाऱ्यांना / कष्टकरणाऱ्यांना पाठबळ देऊन उद्याचे रंग व सृष्टीला जपून ठेवण्याचा मोलाचा संदेश कवयित्री देत आहे.

**प्र.२ आ) दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कोणत्याही एका कवितेचे प्रश्न सोडवा.**

**प्र.२ इ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

दोन दिवस ही कविता नारायण सुर्वे यांनी लिहिली आहे. ही कविता 'ऐसा गा मी ब्रम्ह' या त्यांच्या काव्य संग्रहातून घेतली आहे. स्वतःच्या प्रकृतीशी जुळणारी निवेदनात्मक, संवादाचा वापर प्रभावीपणे करणारी , बोलीभाषेशी जवळीक असणारी, गद्याच्या अंगाने जाणारी विशिष्ट शैली सुर्वे यांनी निर्माण केली. कामगार जीवनाची सुखदुःखे त्याच्या काव्यलेखनाच्या प्रेरणास्थानी असतात. माणसावरील अपार श्रद्धेतून त्यांची कविता साकारली आहे. या कवितेतून दोन दिवस वाट पाहणात गेले; दोन दुःखात गेले असे जीवनाचे वास्तव चित्र रेखाटताना 'भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली' असे भीषण जीवन सत्य कवीने कवितेत मांडले आहे.

**विभाग – ३: स्थूलवाचन**

**प्र.३ पुढीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.**

१) कॅक्टसचे रोप लहान असते तेव्हा त्याला दोन - चार छोटी छोटी पाने येतात तेवढीच. नंतर कॅक्टसचे झाड बिनपानाचे राहते कॅक्टसच्या झाडात रसदार गर असतो. त्यावर प्राण्यांच्या धाडी पडण्याचा मोठा धोका असतो, पण कॅक्टसच्या झाडाने यांचाही बंदोबस्त केला आहे. अनेक कॅक्टस झाडांच्या अंगावर धारदार बोचरे काटे पसरलेले असतात. प्राणी त्याला तोंड लावायची हिंमत करत नाही.

२) पाणी हे पृथ्वीवरील अमृत आहे. पाणी हे पृथ्वीवरील प्रत्येक घटकाला आवश्यक असते. पाण्याशिवाय आयुष्य जगणे शक्य नाही. सृष्टीला जिवंत ठेवण्याचे सामर्थ्य फक्त पाण्यातच आहे. पाणी नसल्याने संपूर्ण धरती मरूभूमीचे रूप धारण करते म्हणून पाणी आवश्यक आहे.

३) टिपा लिहा.

(i) सग्वारो कॅक्टसचे दिसणे –

वाळवंटी प्रदेशाचा कॅक्टस हा अगदी खास प्रतिनिधी आहे. कॅक्टसच्या अनेक जाती आहेत. सग्वारो कॅक्टस हा कॅक्टसचा राजा. तो ५० फूट उंचीपर्यंत वाढतो. म्हणजे कॅक्टस राक्षसासारखाच असतो. त्याची वाढ इतकी मंद असते, की ५० वर्षात तो फक्त ३ फूट वाढतो आणि २०० वर्ष जगतो म्हणजे आज उभे असलेले काही सग्वारो कॅक्टस दुसरे बाजीराव पेशवे यांच्या काळापासूनचे आहेत. तसेच सग्वारोची पन्नास वर्षात तीन फूट वाढ होते या हिशोबाने एक माणूस त्याच्या सबंध आयुष्यात सग्वारो कॅक्टस फार फार तर त्याच्या कमरेच्या थोडासा वरपर्यंत वाढलेला पाहील.

(ii) सग्वारो कॅक्टसचे उपयोग –

अमेरिकेतले रेड इंडियन लोक पूर्वीच्या काळी सग्वारो कॅक्टसचा अनेक प्रकारे उपयोग करून घेत असत. अवर्षणाच्या काळात कॅक्टस चेचून ते त्याचे पाणी काढत आणि तहान शमवण्यासाठी ते पाणी पीत. सग्वोरा कॅक्टसला फळे येतात, त्यामधला गर कलिंगडाच्या गरासारखा असतो. रेड इंडियन लोक ही फळे चवीने खात असत. फळाच्या गरात साखर घालून तो मोरावळ्यासारखा टिकवता येतो.

## विभाग – ४: भाषाभ्यास

**प्र.४ अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती.**

१) तक्ता पूर्ण करा:

| अ. क्र | **सामासिक शब्द** | **विग्रह** | **समासाचे नाव** |
|---|---|---|---|
| १) | मिसळपाव | मिसळ, पाव, वगैरे | समाहार द्वंद्व |
| २) | यथामती | बुद्धी प्रमाणे | अव्ययीभाव |

२) पुढील उदाहरण वाचून सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा.

तुझा रंग पावसाळी नभापरी सावळा आहे.

वरील उदाहरणातील - i) उपमेय - रंग ii) उपमान - पावसाळी नभ

iii) साम्यवाचक शब्द - सावळा iv) अलंकार – उपमा

३) कंसात दिलेल्या सूचनेनुसार वाक्य बदलुन पुन्हा लिहा.

(i) तू विजयी व्हावेस असे मला वाटते.

(ii) मी आपल्या सेवेसाठी आलो नसतो का ?

४) पुढील शब्दांचे सामान्यरुप लिहा.

(i) वर्ग - **वर्गा** (ii) घोडा - **घोडया**

५) खालील वाक्यप्रचारांचा अर्थ लिहून वाक्यात उपयोग करा.

(i) **अर्थ** - खूप राग येणे. **वाक्य-** वर्गात गोंधळ घालताना मुलांना पाहून शिक्षकांच्या <u>अंगाचा तिळपापड झाला</u> (ii)

**(ii) अर्थ** - कुशल असणे. **वाक्य** - रघु बढाया मारण्यात पारंगत होता.

**प्र.४ आ) भाषासौंदर्य**

१) **शब्दसंपत्ती**

i) समानार्थी शब्द लिहा. - अ) आज्ञा - **हुकूम** ब) वन – **अरण्य**

ii) शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा.

अ) मातीपासून भांडी बनवणारा. - **कुंभार** ब) नदीवरील पाणी अडविण्यासाठी बांधलेला बंधारा. - **धरण**

iii) एका शब्दाचे अनेक अर्थ लिहा.

सूर्य : **रवि, दिनकर, भास्कर**

iv) शब्दांतील अक्षरांपासून दोन अर्थपूर्ण शब्द बनवा.

वडगावला : **गाव, वड, लाड, लाव**

२) खालील वाक्यातील चुकीचे शब्द लेखननियमानुसार लिहुन वाक्य पुन्हा लिहा.

i) अशी भावना ते माझ्यामध्ये निर्माण करत. ii) <u>अब्दुल</u> तपोवनला आला तेव्हा <u>कार्यक्रम</u> सुरु होता.

३) पुढील विरामचिन्हांची नावे लिहा.

i) “ ” - **दुहेरी अवतरण चिन्ह** ii) ! - **उद्‌गारवाचक चिन्ह** iii) ? - **प्रश्नवाचक चिन्ह** iv) ; - **अर्धविराम**

४) खालील शब्दांना पारिभाषिक शब्द लिहा. - i) Train - **आगगाडी** ii) footprint - **पाऊलखूणा**

५) शब्दात येणाऱ्या शेवटच्या अक्षरावरून शब्द साखळी बनवा. - i) उत्सव - **वन - नळ**

## विभाग – ५: उपयोजित लेखन

**प्र.५ अ) पत्रलेखन**

१) दि. २७ जानेवारी, २०१६

प्रति,
मा. व्यवस्थापक,
आयडियल ग्रंथ भांडार,
महात्मा गांधी रोड, दादर (प.),
मुंबई.

**विषय –** शालेय ग्रंथालयासाठी पुस्तकांची मगणी.

माननीय महोदय/महोदया,
सप्रेम नमस्कार.

मी अ.ब.क., ‘सरस्वती विद्यालय’ या शाळेतील विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने मुख्याध्यापकांच्या संमतीने हे पत्र लिहीत आहे. आमच्या शाळेत ग्रंथालयासाठी खालील पुस्तकांची आवश्यकता आहे. तरी कृपया ती पुस्तके शाळेच्या पत्त्यावर त्वरीत पाठवून द्यावीत. सोबत पुस्तकांचे देयक (बिल) पाठवावे. जेणेकरुन पुस्तकांची रक्कम त्वरीत देण्याची व्यवस्था करता येईल.

पुस्तकांची यादी पुढीलप्रमाणे:

| क्र. | पुस्तकचे नाव | लेखकाचे नाव | प्रती |
|---|---|---|---|
| १) | शिवछत्रपती | श्री. बाबासाहेब पुरंदरे | ०५ |
| २) | भटाव्याची चाळ | पु.ल. देशपांडे | १० |
| ३) | स्वामी | रणजित देसाई | ०७ |
| ४) | यश तुमच्या हातात | शिव खेरा | ०५ |

वरील पुस्तके विद्यार्थ्यांसाठी असल्यामुळे कृपया पुस्तकांवर योग्य ती सवलत द्यावी, ही नम्र विनंती.
कळावे, तसदीबद्दल क्षमस्व.

आपला विश्वासू,
अ.ब.क.

विद्यार्थी प्रतिनिधी,
सरस्वती विद्यालय,
जोगेश्वरी (प.),
मुंबई.
abc@gmail.com

२) देशावर आक्रमण केले असताना त्याचा प्रतिकार करण्यासाठी सारे राष्ट्र सिद्ध झाले. याचा आघात झेलण्यासाठी अनेक तरुण लष्करात भरती झाले, शत्रूशी झुंजू लागले. राष्ट्रातले स्त्री – पुरुष नागरिकही सर्वस्व त्यागण्यासाठी पुढे सरसावले. निधी जमवण्यासाठी कामगार, शेतकरी, धनिक, श्रमिक इ. पुढे सरसावले.
सर्वजण काही ना काहीतरी देत होते. पण स्वत: जवळ काहीच नसणारा एक जण आपण काही देऊ शकत नाही म्हणुन तळमळत होता. त्याने मदत म्हणुन आपले रक्त देऊ केले.

**प्र.५ आ) पुढील कृती सोडवा.**

१) खालील शब्दांचा आधार घेऊन आकर्षक जाहिरात तयार करा.

**थंड थंड ...... गार गार.......**

**गुड्डीज आईस्क्रीम पार्लर**

आमाच्याकडे सर्व प्रकारची व सर्व चवींची
आईस्क्रीम माफक दरात मिळतात.



**मँगो, सीताफळ,**
**बटरस्कॉच, व्हॅनिला,**
**ब्लॅकबेरी, टुटीफुटी**

**||ग्राहकांचे समाधान हेच आमचे ध्येय ||**

**पत्ता:** गुड्डीज आईस्क्रीम, महात्मा गांधी रोड,
महेश ट्युटोरियल्स समोर, ठाणे (प.)

२) **विज्ञानप्रदर्शनाचा वृत्तांत**

मुलुंड, दि. १ जानेवारी (प्रतिनीधी) – ‘विज्ञानाचे दैनंदिन जीवनातील महत्त्व’ या विषयावर आधारित एक विज्ञान प्रदर्शन नुकतेच ‘सरस्वती विद्यामंदिर, मुलुंड’ येथे भरविण्यात आले होते. या प्रदर्शनाच्या उद्घाटनाला प्रसिद्ध वैज्ञानिक ‘श्री. वसंत गोवारीकर’ प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. विद्यार्थींनी खास मेहनत घेऊन बनविलेल्या विविध दैनंदिन उपयोगाच्या वस्तू हे प्रदर्शनाचे वैशिष्ट्य होते. शाळेचे विज्ञान विषयप्रमुख प्रा. डमरे सर यांचे मार्गदर्शन या सर्व मुलांना लाभले. श्री. वसंत गोवारीकर यांनी मुलांच्या या कामगिरीचे खास कौतुक केले. ‘तुम्हीच भारताचे खरे भविष्य आहात’ असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले. चार दिवस चाललेल्या या प्रदर्शनाला लोकांचा जबरदस्त प्रतिसाद मिळाला. एका विद्यार्थ्याने विजेशिवाय पाणी शुद्ध करणारे उपकरण प्रदर्शनात ठेवले होते. ते सर्वांच्याच आकर्षणाचे केंद्र ठरले.
प्रदर्शनाच्या शेवटी सर्व सहभागी विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. समारोपप्रसंगी बोलताना शाळेचे मुख्याध्यापक श्री. वाघमारे सर यांनी ‘देशाच्या प्रगतीमध्ये तन-मनाने सामील व्हा’ असे विद्यार्थ्यांना आवाहन केले.

**प्र.५ इ) पुढील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा. (शब्दमर्यादा १०० ते १२० शब्द)**

१)

झाड बोलू लागले तर............

उन्हाळयाच्या दिवसात अंगाची काहीली होत होती. वाऱ्यातून उष्णता वाहत होती. सभोवताली झाडांची संख्या तुरळक दिसत होती. इतक्यात मला आठवण आली ती आमच्या कॉलनीतल्या या झाडाची. आमच्या तीन पिढ्यांनी या वडाच्या झाडाला पाहिलं आहे. मनात विचार आला झाड बोलू लागले तर... तर ते म्हणेल,

अगं मुली, माझा जन्मच तुमच्या आनंदासाठी आहे. मी तुम्हाला सावली देतो. तुम्हाला गोड फळे देतो. रंगीबेरंगी फुले देतो. माझ्या सहवासात तुम्ही सुखावता याचा मला खरंच मनोमन खूप आनंद वाटतो.

माझ्या भोवती बांधलेल्या पारावर तुमच्या आजोबांच्या गप्पा चालायच्या. रांधून-वाढून दमलेली आजी, आई, तिच्या मैत्रिणी एकमेकींना त्यांच्या मनातलं हितगुज माझ्या साक्षीने सांगायच्या. तुझ्या सगळ्या बालमैत्रिणी सूरपारंब्यांचा खेळ माझ्या भोवती खेळायच्या तेव्हा मी ही त्यांच्या जोडीने डोलू लागायचो.

झाड जणू काही माझ्या मनातलं बोलू लागले आहे, असा मला भास झाला. झाड पुढे म्हणाले,

खरं तर माझे महत्त्व माणसाच्या आयुष्यातील फार मोठे आहे. माझ्या सावलीत तुम्ही सुखावता. मी प्राणवायूचा पुरवठा करीत असतो. मी नसतो तर पाऊस कसा आला असता? वा-याचा गारवा तुम्ही माझ्यामुळेच अनुभवू शकता. मी मातीला घट्ट धरून ठेवतो. किताही मोठा पाऊस आला तरी माती वाहून जाऊ देत नाही. मी आहे म्हणून तर पक्ष्यांना निवारा मिळतो. अगदी प्राणी, पशू, पक्षी, लहान लहान किडामुंगीही माझ्या सहवासात विसावतात.

आम्ही झाडे जर नसतो तर विविध औषधी वनस्पती तुम्हाला कशा उपलब्ध झाल्या असत्या? सुगंधी चंदन मिळालं नसतं. आंबा, डाळिंब, सफरचंद या फळांची गोडी कळली नसती.

आम्ही आहोत म्हणून तर फुलांचा सुगंध तुम्ही अनुभवू शकता. आमच्यामुळे तुम्हाला हिरव्या रंगाचं सुख लाभलं. आम्ही आहोत म्हणून तर पावसात धरतीने हिरवा शालू पांघरला आहे असे वाटते. आम्ही नसतो तर बालकवींना 'ती फुलराणी' सुचली असती का, की 'जळात बसलेला औदुंबर' दिसला असता!

झाडाचे बोलणे अगदी खरे होते. 'झाड नसते तर' या विचाराने मी हैराण होऊ लागले. एवढ्यात झाड म्हणाले,

आज जिकडे तिकडे सिमेंटचे शहर वाढत आहे. त्यामुळे माझी तुम्हाला अडचण वाटते. तुम्ही निर्दयीपणे आमची कत्तल करता. आमची मातीशी असलेली नाळ तोडून टाकता. पण ख-या अर्थाने कु-हाड आमच्यावर चालवत नसून तुमच्याच पायावर मारता आहात. आम्ही नसू तर वाढत्या प्रदूषणाला आळा कसा घालाल? वाढत्या तापमानात गारवा कसा मिळवाल? आमचे अस्तित्व संपले तर तुमचे आयुष्य नीरस होऊन जाईल. तुकाराम महाराजांच्या, 'वृक्ष वल्ली आम्हा सोयरी वनचरे' या वचनाचा विसर पडू देऊ नका. निसर्गाचा समतोल सांभाळणे तुमच्याच हातात आहे.

आपल्या सगळयांच्या आयुष्यात महत्त्वाचे स्थान असलेल्या या झाडांना मी मनोमन नमस्कार केला.

*This question paper is for practice purpose only.